१६. महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत योग्य ते विकास शुल्क भरुन महानगरपालीका/नगरपालीका च्या पुर्व परवानगी घेतल्या शिवाय या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

१७. अर्जदाराने दाखल केलेले कागदपत्रे, मोजणी नकाशा व जागेच्या मालकी हक्काबाबत वाद उद्‌भवल्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

१८. उक्त जागेच्या वापरासाठी अनुज्ञेय विविध परवानगी प्राप्त करणे हे अर्जदार / विकासक यांना बंधनकारक राहील.

१९. आवेदकाने वर नमुद केलेल्या अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करावे.

२०. वरीलपैकी कोणतीही अट आवेदकास मान्य नसल्यास मौजा पेठ अमरावती ता. अमरावती येथील शेत शेत स.नं. ६४ मधील क्षेत्र. ०.०९ हे.आर जमीन ही निवासी प्रयोजनार्थ वापर करण्यासाठी अकृषिक आकारणी बाबतचा हा आदेश रद्द समजण्यात यईल.

स्वा/- (किरण गित्ते)
जिल्हाधिकारी अमरावती

प्रतिलीपी :

१. आयुक्त महानगर पालीका, अमरावती यांनी अभिन्यासातील खुल्या जागेचा, बगीचा खेळाचे मैदान विकसीत करावे, तसेच रस्त्यासाठी सोडलेल्या जागेत अतिक्रमण होणार नाही याची खबरदारी घ्यावी तसेच रस्ते करण्यासाठी नियोजन करावे.

२. सहाय्यक संचालक, नगर रचना महानगर पालीका अमरावती यांना मंजुर अभिन्यासाच्या प्रतिसह माहीती करीता अभिन्यासामध्ये नागरी सुवीधा जसे पाणी, जलनिस्सारण, दिवाबत्ती इत्यादीची व्यवस्था करावी.

३. सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्याकंन अमरावती विभाग, अमरावती व्दारा डॉ विजय बोंडे यांचा बंगला, मांगीलाल प्लॉट, कॅम्प, अमरावती यांना त्यांचे दि.०४.०२.२०१३ चे पत्राचे अनुषंगाने मुल्यदर तक्ते करण्यासाठी अग्रेषीत

४. कार्यकारी अभियंता म.रा.वि.म. अमरावती यांना अभिन्यासाच्या प्रतिसह माहीती व आवश्यक कार्यवाही करीता, त्यांनी या मंजुर अभिन्यासाप्रमाणे घरगुती जोडण्या देण्याचे करावे. तसेच सब स्टेशन/ट्रान्सफार्मर/वाहीन्या इत्यादी टाकुन विकास करावा.जेणेकरून प्लॉट धारकांना वेळेवर विज पुरवठा होऊ शकेल.

५. उपविभागीय अधिकारी **अमरावती** गांव तलाठी यांनी सुधारीत दराप्रमाणे पुढीलवर्षी महसूल मागणी निश्चीत करून प्रत्येकवर्षी वसुली होते किंवा नाही हे पहावे.

६. अधिक्षक भुमी अभिलेख अमरावती यांना माहीती करीता.

७. उपअधिक्षक, भुमी अभिलेख **अमरावती** यांना अभिन्यास प्रतिसह माहीती व आवश्यक कार्यवाही करीता.

८. तहसिलदार **अमरावती** यांना माहीतीकरीता तलाठी यांना दिलेल्या सुचनेनुसार अंमलबजावणी करून या कार्यालयास अहवाल सादर करावा.

९. तलाठी **पेठ अमरावती** ता. **अमरावती** जि.**अमरावती** यांना अभिन्यासाच्या मंजुर प्रतिसह आवश्यक कार्यवाहीकरीता. त्यांनी संदर आदेशाची अमंलबजावणी करुन रेकॉर्ड मध्ये दुरूस्ती करावी तसेच अकृषिक कर आकारणी वसुल करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा सुधारीत अहवाल ७/१२ व गाव नमुना-६ च्या उताऱ्यासह कार्यालयात सादर करावा.

१०. **पद्म बिल्डर्स तर्फे पार्टनर १. श्री.गोपाल सत्यनारायण** करवा
२. श्री. ज्ञानेश्वर श्रीकृष्ण गणोरकर ३. सौ. रेखा प्रकाश पनपालीया रा. अमरावती
यांना मंजुर अभिन्यासासह माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

जिल्हाधिकारी अमरावती करीता.

म. जिल्हाधिकारी, यांनी अनुमोदीत केले